# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २२९/२००८/ दिनांक :

१) श्री. आप्पासाहेब पिरसाहेब मुजावर,
मु.पो. शेगांव , ता. जत, अर्जदार
जिल्हा सांगली.

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडल कार्यालय, विश्रामबाग,
सांगली.

२) कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. विरूध्द पक्षकार
कवठे महकांळ, जि. सांगली.

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
उपविभागीय कार्यालय, जत,
जि. सांगली

**कोरम** :- १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य-सचिव
३ श्री. जी.सी. लेले, सदस्य

श्री. हरिभाऊ दिगंबर खापरे, तक्रारदार प्रतिनिधी

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार



श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,ग्रा.त.नि.मंच यांचेतर्फे

प्रस्तुत अर्ज/ अपील हे दिनांक १९.९.२००८ रोजी या कार्यालयात प्राप्त झाले आहे. अर्जदार हे मौंजे शेगांव, ता. जत, जि. सांगली येथील रहिवाशी आहेत. मौंजे शेगांव येथील गट क्र. २२४ मध्ये शेती पंपासाठी वीज पुरवठा मिळणे बाबत अर्जदाराने ऑगस्ट २००० अनामत रक्कम वीज मंडळाकडे भरली होती. पुढे २००८ पर्यंत असा वीज पुरवठा त्यांना देण्यात आला नाही. सबब दि. २८.३.२००८ रोजी क्ष नमुन्यामध्ये अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, सांगली यांचेकडे त्यांनी तक्रार अर्ज दाखल केला. त्यामध्ये सुनावणी होवून आदेश देण्यात आला की, जरुर ते पोल व विद्युत वाहिनीचे नियोजन करुन तीन महिन्यांचे आंत एस.ओ.पी. विनियमाप्रमाणे शेतीपंपास वीज पुरवठा करण्यात यावा. अर्जदार यांनी दिनांक २.६.२००८ रोजी चाचणी अहवाल सादर केला.

पुढे अर्जदाराचे म्हणणे की, वरील आदेश असतांनाही दिनांक २.९.२००८ व आवश्यक ती पूर्तता झाली असतांनाही दिनांक २.९.२००८ पर्यंत कांहीही कार्यवाही झालेली नाही. पुढे अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाचे आदेशाप्रमाणे आदेशाची अंमलबजावणी न झालेने प्रस्तुत अर्ज ग्राहकाने दाखल केला आहे. सबब विनंती की, विद्युत पुरवठा करणेत यावा तसेच झालेल्या दिरंगाईबद्दल एस.ओ.पी. विनियमा प्रमाणे नुकसान भरपाई मिळावी तसेच सहाय्यक अभियंता, जत यांचेकडून निष्काळजीपणाच्या कृत्याबाबत रु. १,०००/- ची शास्ती मिळावी.

वरील प्रमाणे तक्रार अर्जा संबंधात वि.प.स नोटीस काढून म्हणणे दाखल करण्यास संधी दिली. त्याप्रमाणे दिनांक १६.१०.२००८ रोजी कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ यांच्याकडून म्हणणे दाखल झाले व सोबत कागदपत्रे दाखल केली. वि.प.चे म्हणणे असे की, अर्जदारानेच सन २००० मध्ये अनामत रक्कम भरली होती. परंतु त्यांचे विद्युत वाहिनीचे काम करीत असतांना श्री. हसन मुजावर यांनी हरकत घेतली होती. पुढे अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाचा निर्णय झालेनंतर संबंधित कामासाठी एक पोल लागत असलेने नवीन अंदाजपत्रक ०.३ चे मंजूर करुन घेवून दि. ५.१०.२००८ रोजी तक्रार अर्जदारास कनेक्शन देण्यात आलेले आहे व त्यांनी मागणी पूर्ण केलेली आहे. सदरच्या म्हणणे सोबत अर्जदार यांचे काम पूर्ण झाले बाबतचे पत्रही

जोडणेत आले आहे. तसेच दरम्यानचे काळात संबंधित ठिकाणी पाऊस झाला असलेने पोल टाकून वाहिनी जोडण्याचे काम झाले नाही अशा बाबतचे सहाय्यक अभियंता यांचे पत्रही देण्यात आले आहे. एकूण वि.प.चे म्हणणे की, तक्रार अर्जदार यांच्या कामाची पूर्तता झाली आहे. या प्रकरणी सुनावणीची तारीख ४.११.२००८ रोजी ठेवण्यात आली. परंतु संबंधितवेळी दिवसभरामध्ये तक्रार अर्जदसर श्री. आप्पासाहेब पीरसाहेब मुजावर अथवा त्यांचेतर्फे कोणी प्रतिनिधी हजर झाले नाहीत. मात्र वि.प.तर्फे कार्यकारी अभियंता, कवठे महांकाळ श्री. भोसले, सहाय्यक अभियंता श्री. उत्पात हजर झाले.

प्रकरणाचा विचार करता. अर्जदाराच्या अनुपस्थितीमध्ये वि.प.चे म्हणणे ऐकले. तद्‌नंतर आजपर्यंत देखील अर्जदार हजर झाले नाहीत व आपले म्हणणे मांडले नाही. आज रोजी सदरचे प्रकरण न्याय मिळणेसाठी विचारात घेण्यात आले. या प्रकरणामध्ये आमच्यासमोर आलेल्या कागदपत्रावरुन व वि.प.तर्फे दाखल केलेल्या कामाच्या पूर्तते संबंधातील कागदपत्रांचा विचार करता, खालील मुद्दे आमचे निष्कर्षास उद्‌भवतात.



१) अर्जदार यांची वीज जोडणी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाने दिलेल्या आदेशानुसार ३ महिन्यांच्या मुदतीमध्ये पूर्ण झाली नाही या बाबत योग्य ते स्पष्टीकरण दिसून येते काय ?

उत्तर : होय

२) अर्जदार यांना वीज जोडणीस विलंब झाले बाबत त्यांनी मागणी केल्याप्रमाणे नुकसान भरपाई मिळणेचा हक्क आहे काय ?

उत्तर : नाही

**<u>कारणमिमांसा</u>**

प्रस्तुत प्रकरणी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाचे दिनांक २८.५.२००८ रोजी आदेश देवून अर्जदार यांना ३ महिन्याचे अवधीमध्ये वीज पुरवठा करणेचा आदेश दिला. अर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे दि. २.६.२००८ रोजी त्यांनी चाचणी अहवाल वि.प.कडे दाखल केला. म्हणजे त्यानंतर ३ महिन्यांचा अवधी दि. २.९.२००८ पर्यत संपुष्टात येतो. परिणामी, अर्जदाराने दि. १५.९.२००८ रोजी प्रस्तुत अपील दाखल केले आहे. मात्र वि.प.चे लेखी स्पष्टीकरणाप्रमाणे असे दिसून येते की, अर्जदाराने कांही गोष्टी मंचापुढे आणलेल्या नाहीत. त्या अशा की, सदरचे वीज जोडणीकामी हसन मुजावर यांनी हरकत घेतली होती. त्यांच्यावर पोलीस कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच लगत क्षेत्रामध्ये पाऊस झालेला होता व चिखल झाल्यामुळे वीज जोडणीचे काम करण्यात आलेले नाही. मात्र वि.प.ने दि. ५.१०.२००८ रोजी संबंधित काम करुन वीज पुरवठा अर्जदारास दिलेला आहे. तेव्हा असे दिसून येते की, दि. १५.९.२००८ चा अर्ज जो या कार्यालयात दिनांक १९.९.२००८ रोजी मिळाला, त्यावेळी जरी काम पूर्ण झाले नव्हते, तरी पुढे दि. ५.१०.२००८ रोजी सदरचे काम पूर्ण झालेले आहे. आदेशाप्रमाणे सुमारे १ महिना २ दिवसांचा विलंब झालेचे दिसून येत आहे. परंतु हा

विलंब लगतच्या क्षेत्रामध्ये पाऊस झाल्यामुळे संबंधित काम पूर्ण करता आले नाही ही भौंगोलिक परिस्थिती विचारात घेता असा विलंब हा मुद्दाम केलेला नाही असे दिसून येते. सबब झालेला विलंब हा योग्य व नैंसर्गिक कारणामुळे झालेला आहे. महाराष्ट् विद्युत नियामक आयोग कृती मानकेचे कलम ११प्रमाणे संबंधित बाब ही अपवाद म्हणून विचारात घेण्यात आली आहे. सबब कृती मानके प्रमाणे झालेलेया विलंबा बाबत नुकसान भरपाई अथवा विलंबा बाबत देय रकमेत सूट देण्याची आवश्यकता नाही व अर्जदार तक्रारदारास तसा हक्क पोहोचत नाही. सबब वरील कारणावरुन आम्ही वरील दोन्ही मुद्द्यांबाबत आमचे निष्कर्ष नोंदवित आहोत.

एकूण सर्व बाबींचा विचार करता, अर्जदारास जरी विद्युत पुरवठा देण्यात आलेला नव्हता तरी देखील तद्नंतर दिनांक ५.१०.२००८ रोजी विद्युत पुरवठा देण्याचे काम पूर्ण झाले आहे व तशी अर्जदाराची पावती घेण्यात आली आहे. सबब सदर अर्ज निकाली काढणे क्रमप्राप्त ठरते. यातील विषयाचा विचार करता, खर्चाबाबत कोणत्याही आदेशाची आवश्यकता नाही. सबब आदेश –



## आदेश

१) अर्जदाराची तक्रारीचे निवारण झाले असलेने अर्ज निकाली काढणेत आला.

२) खर्चाबाबत आदेश नाही

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( काकासाहेब य . जगताप )
अध्यक्ष,
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : ११.११.२००८

श्री. जी.सी लेले, ग्राहक सदस्य ..

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव ..

सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच यांचे मत

सदर सुनावणीवेळी खुद्द तक्रारदार किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहिले नाहीत याची नोंद घेणेत आली. वि.प.कडून वीज जोडणी देणे कामी मंजूर असलेली वाहिनी उभारणीचे कामा करीता प्रयत्न झालेचे स्पष्ट होत आहे व संबंधिताविरुध्द त्या कारणे पोलीस तक्रार हि वि.प.ने केलेचे सांगण्यात आले. परंतु त्यावेळी केलेल्या पोलीस तक्रारीची कागदपत्रें उपलब्ध नसलेचे वि.प.कडून सांगण्यात आले.

अंतर्गत कक्षाचे निकालपत्रात नमूद केलेनुसार अर्जदाराने दि. २७.९.२००४ रोजी शेतीपंप बसविलेचा चाचणी अहवाल दिला होता. प्रत्यक्षात तपासणी केली असता संच माडणी नव्हती. म्हणून सदर चाचणी अहवाल रद्दबादल ठरविला. त्यानंतर अर्जदाराने नव्याने दि. २.६.२००८ रोजी शेतीपंप बसविलेचा अहवाल दिला. त्या तारखेपासून ३ महिन्यात वीज जोडणी होणे अपेक्षित होते. तथापि, अद्यापपावेतो तक्रारदाराचे भाऊ श्री. हसन मुजावर यांचेकडून तक्रारदाराचे लघुदाब वीज वाहिनी उभारणी कामास अडथळा केला जात होता. म्हणून पुन्हा सहा.अभियंता, उप विभाग जत यांचे पत्र क्र. ३८९२ दि. १६.९.२००८ ने पोलीस निरीक्षक यांचेकडे संरक्षण मागितले वदरम्यानचे काळात मुख्य तक्रारीची सोडवणूक होवून मार्ग निघणे करीता दुसऱ्या बाजूने वाहिनी देणेस फेरमंजुरी घेणेत येऊन त्यानुसार का म करणेत आले. त्या करीता वाहिनी रुपांतरीत करणेऐवजी नवीनच ०.३ कि.मी. वाहिनी मंजुरी क्र. एसपीए पीई/९५०१६९/१८९/०८–०९ दि. १.१०.२००८ ने मंजुरी केली व दि. ५.१०.२००८ रोजी तक्रारदार श्री. आप्पासाहेब पीरसाहेब मुजावर यांची शेती वीज पंप जोडणी करणेत आली.

या वरुन स्पष्ट होते की, वितरण कंपनीकडून तक्रारदार यांची तक्रार सोडवणूक करणे करीता प्रामाणिक प्रयत्न झाले आहेत व तक्रादारांची वीज जोडणीचे काम प्राधान्याने करणेत आले आहे. लघुदाब वाहिनीचे काम आयोगाचे विनियम २००५ नुसार ३ महिने मुदतीत करणे होते. सदर मुदत संपून ४ आठवडे जादा लागले असले तरी वितरण कंपनीकडून तसेच तक्रारदाराचे खुद्द भावाने लाईन उभारणीस केलेला अडथळा हा वि.प.चे नियंत्रणा पलिकडचा प्रकार असलेमुळे काम पूर्ण करणेस विलंब झालेला आहे. तसेच अर्जदाराने काम झाले असलेमुळे तक्रार नाही असे लेखी निवेदन दिलेले आहे. सबब वि.प.ला वीज जोडणी देणेस झालेल्या चार आठवड्यांचे विलंबास्तव नुकसान भरपाई देणे विचारात घेणेत येऊ नये. तेच सहाय्यक अभियंता, जत यांनी

कोणत्या प्रकारचा निष्काळजीपणा दाखविला ? या बाबत स्पष्टपणे नमूद केले नाही. त्यामुळे त्यांनी अर्जदारास शास्ती म्हणून रु.१,०००/– द्यावी ही मागणी विचारात घेता येणार नाही.

( एस.आर. बाबंळे )
सदस्य सचिव
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर